दिनांक २७/०३/२०२३

## प्रसिध्दी पत्रक

आरोपी लोकसेवक 1) श्री. शिरीष रामकृष्ण घनबहादुर, वय 49 वर्षे, पद-तालुका कृषी अधिकारी ता. खुलताबाद (वर्ग-2) 02) विजयकुमार नरवडे, वय 57 वर्षे, पद-मंडळ कृषी अधिकारी (वर्ग-2) 03) सागर नलावडे, वय 24 वर्षे, कंत्राटी ऑपरेटर कृषी विभाग खुलताबाद 04) बाळासाहेब संपतराव निकम, वय 57 वर्षे, पद-कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय खुलताबाद (वर्ग-2) यांनी तक्रारदार यांच्याकडुन लाचेची रोख रक्कम 24,500/- रुपये स्विकारल्याने, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबादच्या जाळ्यात.

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | :- | औरंगाबाद |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे खुलताबाद, औरंगाबाद ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे. |
| आरोपी लोकसेवक यांचे नाव व पत्ता | :- | 01) श्री. शिरीष रामकृष्ण घनबहादुर, वय 49 वर्षे, पद-तालुका कृषी अधिकारी ता. खुलताबाद (वर्ग-2)<br>02) विजयकुमार नरवडे, वय 57 वर्षे, पद-मंडळ कृषी अधिकारी (वर्ग-2)<br>03) सागर नलावडे, वय 24 वर्षे, कंत्राटी ऑपरेटर कृषी विभाग खुलताबाद<br>04) बाळासाहेब संपतराव निकम, वय 57 वर्षे, पद-कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय खुलताबाद (वर्ग-2) |
| लाच मागणी रक्कम | :- | 24,500/- रुपये. |
| लाच स्विकृती रक्कम | :- | 24,500/- रुपये. |
| तपास अधिकारी | :- | दिलीप साबळे, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांचे पोखरा स्किम, नानाजी देशमुख, कृषी संजीवनी योजनेअंतर्गत दाखल फाईल मंजुर करणे व माहिती अधिकार अर्ज फाईल करण्यासाठी. |
| थोडक्यात माहिती | :- | यातील तक्रारदार हे ठिबक संचन साहित्याचे डीलर असून त्यांनी (पोखरा स्कीम) नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेअंतर्गत विभागातील 35 शेतकऱ्यांना कृषी ठिबक सिंचन साहित्य पुरवठा केल्या बाबतच्या परस्पर 35 फाईल मंजुर करुन अनुदान घेतल्याने संचिका मंजुर करणे व तक्रारदार यांचे विरुध्द आलेला माहिती अधिकार अर्ज प्रकरण मिटविण्यासाठी यातील आ.लो.से.क्रं.02 श्री. विजय कुमार नरवडे यांनी स्टॉक रजिस्टर चेक करण्यासाठी व प्रत्येकी सातशे रुपये फाईल याप्रमाणे 35 फाईलीचे 24,500/- तक्रारदार यांच्याकडे लाचेची मागणी करित असल्याने, तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद या कार्यालयात तक्रार दिली.<br>तक्रारदार यांचे तक्रारीवरुन केलेल्या पडताळणी दरम्यान आ.लो.से. क्रं. 02 श्री. विजय कुमार नरवडे यांनी तक्रारदार यांच्याकडे 24,500/- रुपयाची लाचेची मागणी पंच साक्षीदारांसमक्ष केल्याचे निष्पन्न झाले.<br>त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,औरंगाबाद तर्फे आज दि.27/03/2023 रोजी सापळा आयोजीत केला असता, आ.लो.से.नं.02) विजयकुमार नरवडे यांनी स्टॉक रजिस्टर चेक करण्यासाठी व तक्रारदार यांचे विरुध्द आलेला माहिती अधिकार अर्ज फाईल करण्यासाठी तसेच अनुदान प्राप्त 35 फाईल करिता प्रत्येकी सातशे रुपये फाईल याप्रमाणे 24,500 रुपये ची लाच मागणी केली व त्यांचे सांगणेवरुन आ.लो.से. नं. 03 श्री. सागर नलावडे यांनी 24,500/-रुपये लाच रककम स्वीकारली. आ.लो.से. क्रं. 04 श्री. बाळासाहेब निकम, कृषी अधिकारी यांनी मुळ लाच मागणीशिवाय अधिकचे 1000 रुपये हे स्टॉक रजिस्टर तपासण्यासाठी मागणी करुन ते 1000/- रुपये स्विकारले. तसेच आ.लो.से.क्रं.01 यांनी तक्रारदार यांना लाच रक्कम 24,500/- रुपये देण्यासाठील दबाव आणला व त्यानंतर आ.लो.से.क्रं.02 विजयकुमार नरवडे यांना प्रोत्साहन दिले. आ.लो.से.क्रं. 03) सागर नलावडे यांनी लाचेची रक्कम 24,500/-रुपये पंच साक्षीदारा समक्ष तक्रारदार यांचेकडून साई हॉटेल खुलताबाद येथे स्विकारल्यानंतर लाचेच्या रक्कमेसह आ.लो.से. क्रं. 03,01,02,04 यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचे विरुद्ध पो.ठाणे खुलताबाद औरंगाबाद ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मा.संदिप आटोळे, अपर पोलीस अधीक्षक मा. विशाल खांबे, पोलीस उप अधीक्षक मारुती पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधीक्षक दिलीप साबळे यांनी केली आहे. त्यांना सदर कारवाई कामी पोलीस अंमलदार भिमराज जिवडे, दिगंबर पाठक, शिरीष वाघ, बाळू थोरात, रविंद्र काळे, चालक चंद्रकांत शिंदे यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद
ई- मेल :- sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com
ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,
पोलीस अधीक्षक :- 9923023361 अपर पोलीस अधीक्षक :- 8788644994
पोलीस उप अधीक्षक :- 9356115189

(दिलीप साबळे)
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
औरंगाबाद.